# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १७४) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.०८ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## महायुतीत कोणताही नवीन पक्ष येणार नाही-मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या पुन्हा एकदा मोठ्या उलथापालथीच्या चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यात मुंबईत बैठक झाल्याच्या बातम्या समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शरद पवारांचा पक्ष भाजपसोबत जाणार का, अशी चर्चा रंगली असतानाच, देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीतून या चर्चांवर महत्त्वाचे विधान केले आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत नर्मदा नदी खोऱ्यातील प्रकल्पांसंदर्भात एक उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्राला १० टीएमसी पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी राज्यातील राजकीय घडामोडींवर भाष्य केले.

'महाराष्ट्रातून राष्ट्रीय लोकशाही आघाडीत किंवा राज्यातील महायुतीत सध्या कोणताही नवीन पक्ष येणार नाही. पक्षाच्या विस्तारासाठी किंवा आगामी निवडणुकांसाठी कोणाचाही पक्ष फोडण्याचा आमचा कोणताही हेतू नाही. सध्याची महायुती भक्कम असून आगामी काळातही आम्ही एकत्रच पुढे जाणार आहोत.' 'शरद पवारांच्या पक्षाचे आमदार किंवा खासदार फोडण्याचा आमचा कोणताही प्रयत्न नाही,' असे स्पष्ट करत त्यांनी या संभाव्य पक्षफुटीच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

## ''ज्ञानोबा-तुकाराम''च्या जयघोषाने दुमदुमली देहूनगरी; तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

देहूगाव दि.७ (प्रतिनिधी)- संतश्रेष्ठ श्री संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीचा अखंड गजर, ''ज्ञानोबा-तुकाराम''च्या जयघोषाने दुमदुमलेले वातावरण, टाळ-मृदंगाचा निनाद आणि लाखो वारकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग अशा भक्तिमय वातावरणात श्रीक्षेत्र देहूगाव येथून श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे दुपारी ३ वाजता प्रस्थान ठेवले. कोल्हापूरचे युवराज संभाजीराजे छत्रपती व त्यांच्या पत्नी आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते विधिवत पूजा यावेळी संपन्न झाली.

मानाच्या अश्वांची प्रदक्षिणा, पारंपरिक धार्मिक विधी, मानकरी, दिंड्यांचे वीणेकरी आणि भाविकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याने अवघे देहू भक्तिरसात न्हाऊन निघाले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेल्या या पालखी प्रस्थान सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी राज्यासह देशाच्या विविध भागातून आलेल्या भाविकांनी देहूनगरी फुलून गेली होती. पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी, ढगाळ हवामानात पावसाला आनंदाने अंगावर घेत अत्यंत उत्साही आणि प्रसन्न वातावरणात जलाभिषेक करीत वैष्णवांचे दैवत असलेल्या पांडूरंगाच्या भेटीला जाण्यासाठी तुतारी, टाळ मृदंगाच्या निनाद, विण्याचा झंकार करीत वारकरी मुक्तपणे ध्येयभान हरखून विविध पाऊलांसह फुगड्या खेळत आनंद व्यक्त करीत होते.

विधिवत पूजेनंतर हा पालखी सोहळा प्रदक्षिणेसाठी भजनी मंडपातून बाहेर पडला. सायंकाळी सहाच्या सुमारास हा सोहळा इनामदार वाड्यात पहिल्या मुक्कामासाठी रवाना झाला. आषाढी वारीत सहभागी झालेले वारकरी खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका आणि महिला वारकऱ्यांनी डोक्यावर तुळशीवृंद घेऊन मुखी हरिनामासह ''ज्ञानोबा- तुकाराम'' हा जयघोष करीत हा पालखी सोहळा लाखो भाविकांचा भक्तीचा महासागर पंढरीच्या वाटेला लागला. यावेळी चोपदाराचा दंड आणि शिंगाड्याच्या आवाज होताच साऱ्या आसमंतांत मृदंग, टाळ,विणा यांच्या निनाद गुजला आणि सार देऊळवाडा परिसर दमाणून गेला होता. श्री क्षेत्र देहूगाव मध्ये पालखीचे प्रस्थान असल्याने मुख्य मंदिर, वैंकुठगमण मंदिर परिसरातील पहाटे पासूनच फुललेला होता. भाविकांच्या जीविताची काळजी घेण्यासाठी पहाटे पासून इंद्रायणी नदी काठी आंघोळीला जाण्यासाठी पोलीस मज्जाव करण्यात आला होता. त्यामुळे



भाविकांना ज्या ठिकाणी मुक्काम केला होता त्याच ठिकाणी आंघोळ करून भाविकांनी व वारकऱ्यांनी थांबावे असे अवाहन संस्थान, नगरपंचायत प्रशासन व पोलीस प्रशासन यांच्याकडून करण्यात येत होते.

## आजपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसात घट होणार

### पुढील १० दिवस ब्रेक मिळण्याची शक्यता; कृषी विभागाचा शेतकऱ्यांना मोठा सल्ला

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- जुलै महिन्याच्या सुरुवातीला मुंबई, ठाणे, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला अतिवृष्टीने झोडपून काढले असले, तरी आता राज्यासाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. येत्या ८ जुलैपासून महाराष्ट्रातील बहुतांश भागांमध्ये पावसाचा जोर लक्षणीयरीत्या कमी होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पावसाची ही विश्रांती किमान पुढील १० दिवस कायम राहण्याची शक्यता असून, या काळात अनेक जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस अपेक्षित आहे, अशी माहिती सरकारच्या वतीने देण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात (१५ जुलैपर्यंत) राज्याच्या काही भागांत धुवांधार पाऊस झाला असला, तरी दुसऱ्या पंधरवड्यात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी (अत्यल्प) राहू शकते. पाऊस कमी होणार असल्याने राज्यातील कमाल तापमानात पुन्हा वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे नागरिकांना काहीसा उकाडा सहन करावा लागू शकतो.

मुंबई आणि घाटमाथ्यावर पावसाने धुमाकूळ घातला असला, तरी राज्यातील अनेक भागांत अजूनही सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने खानदेश (धुळे आणि नंदुरबार), मध्य महाराष्ट्र (अहिल्यानगर व सोलापूर), पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागांचा समावेश आहे, जिथे अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा आहे.

हवामानाची ही बदलती स्थिती पाहता राज्याच्या कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची नियमावली आणि आवाहन जारी केले आहे. ''राज्यातील ज्या भागांमध्ये अद्याप समाधानकारक आणि पुरेसा पाऊस झालेला नाही, तिथल्या शेतकऱ्यांनी केवळ ढगाळ वातावरण पाहून पेरणीची घाई करू नये. जोपर्यंत जमिनीत पेरणीयोग्य पुरेसा ओलावा निर्माण होत नाही, तोपर्यंत पेरणी थांबवावी. शेतकऱ्यांनी हवामानाच्या या कोरड्या स्पेलचा अंदाज घेऊनच आपल्या शेतीकामांचे आणि पुढील पिकांचे नियोजन करावे,'' असे कृषी विभागाने म्हटले आहे.

## जयंत पाटील आणि विनोद तावडे यांची मुंबईतील पंचतारांकित हॉटेलमध्ये भेट

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- एकनाथ शिंदे यांच्या ऑपरेशन टायगरमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात उडालेली खळबळ शांत होत असतानाच आता राजकीय वर्तुळात आणखी एक महत्त्वाची घडामोड घडण्याचे संकेत मिळत आहेत. मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये झालेल्या दोन बड्या नेत्यांच्या भेटीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा उलथापालथ होण्याची चिन्हे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि भाजपचे वरिष्ठ नेते विनोद तावडे या दोघांची मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमधे शुक्रवारी बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, विनोद तावडे आणि जयंत पाटील यांच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष महायुतीत सहभागी झाल्यास पक्षाच्या वाट्याला काय येऊ शकतं? याबाबत चर्चा झाल्याचे समजते. विनोद तावडे आणि जयंत पाटील यांच्यात चर्चा पार पडल्यानंतर जयंत पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एक वरिष्ठ नेता यांच्यातदेखील बैठक पार पडल्याची माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष (पान ४ वर)

## ढगफुटीची अफवा पसरवली; सपकाळांचा फडणवीसांवर गंभीर आरोप, महाजनांचे प्रत्युत्तर

नाशिक दि.७ (प्रतिनिधी)- इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, सुरगाणा आणि नाशिक तालुक्यात मुसळधार पाऊस सुरू असून ढगफुटीचा धोका टळला असला, तरी यावरून भाजप आणि काँग्रेसमध्ये नवा राजकीय वाद रंगला आहे. अयोध्या येथील राम मंदिरातील कथित अपहाराच्या निषेधार्थ काँग्रेसने राज्यभर 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रहाचे आयोजन केले आहे. या आंदोलनाची सुरुवात मंगळवारी नाशिकच्या काळाराम मंदिरातून करण्यात आली. हे आंदोलन दडपण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकमध्ये ढगफुटी होणार असल्याची खोटी अफवा पसरवल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. त्याला राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी, अशा लोकांमुळे काँग्रेस रसातळाला गेली आहे, असे प्रत्युत्तर दिले.

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरात ढगफुटीची शक्यता असून काही भागांत ३०० मिलिमीटरपर्यंत पाऊस होऊ शकतो, अशी माहिती आदल्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. त्यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार प्रशासनाने युद्धपातळीवर तयारी करत शाळा, महाविद्यालये आणि आठवडे बाजार बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. सर्व यंत्रणांनी सज्ज राहून खबरदारीच्या उपाययोजना केल्या.

दरम्यान, घाटमाथा परिसरात मुसळधार पाऊस सुरूच होता. याच पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रहाला नाशिकच्या काळाराम मंदिरातून प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली सुरुवात झाली. यावेळी खासदार शोभा बच्छाव, प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी, शरद अहिर, नाशिक शहर काँग्रेसचे अध्यक्ष निलेश ऊर्फ बबलू खैरे आदी उपस्थित होते.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सपकाळ यांनी मुख्यमंत्री फडणवीस आणि राज्य सरकारवर गंभीर आरोप केले.

काँग्रेसचे आंदोलन मोठ्या प्रमाणावर होऊ नये आणि लोकांचे लक्ष विचलित व्हावे, यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाशिकमध्ये ढगफुटी होणार असल्याची खोटी अफवा पसरवली. संपूर्ण राज्यात पाऊस सुरू असल्यामुळे आम्ही आंदोलनाला माफक स्वरूप दिले. मात्र, हे आंदोलन होऊ नये आणि नागरिकांनी त्यात सहभागी होऊ नये, यासाठी हवामान विभागाने कोणताही इशारा दिलेला नसतानाही ढगफुटीची अफवा पसरवण्यात आली. भाजपचे बिंग फुटू नये म्हणून मुख्यमंत्री फडणवीस यांनी खोटे वक्तव्य केले, असा आरोप त्यांनी केला.

## महाबळेश्वरमध्ये १०० वर्षांतील विक्रमी पाऊस

### २४ तासांत ५१३ मिमिची नोंद, अतिट गावात ढगफुटी

सातारा दि.७ (प्रतिनिधी)- राज्यात मराठवाडा वगळता विविध विभागात जोरदार पाऊस सुरू असून मुंबई, उपनगरात पावसामुळे शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. तर, पश्चिम महाराष्ट्रातही मुसळधार पाऊस पडत असून सातारा जिल्ह्यात गेल्या २४ तासांत विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यावर पावसाने अक्षरशः कहर केला असून महाबळेश्वरमध्ये गेल्या २४ तासांत तब्बल ५१३ मिलिमीटर म्हणजेच २० इंच इतक्या विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे यंदाचा हा पाऊस शतकातील सर्वाधिक पावसांपैकी एक मानला जात आहे.

यंदाच्या गेल्या २४ तासातील पावसाने सातारा जिल्ह्याच्या पश्चिमेकडील डोंगरी भागातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. महाबळेश्वरमध्ये अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचले असून, ठिकठिकाणी दरडी कोसळल्या आहेत. अनेक रस्ते खचले, झाडे उन्मळून पडली, वीजपुरवठा खंडित झाला आणि अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. ग्रामीण भागातील घाटरस्त्यांवर मातीचे ढिगारे आणि मोठमोठे दगड आल्यामुळे काही गावांचे संपर्क तुटले (पान ४ वर)

## खासगी शिकवणी वर्गांवर नियंत्रण ठेवणारा स्वतंत्र कायदा पुढील अधिवेशनात; शिक्षणमंत्री दादा भुसे यांची ग्वाही

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- राज्यातील खासगी शिकवणी वर्गाच्या मनमानीवर लगाम घालण्यासाठी राज्य सरकार स्वतंत्र कायदा आणण्याच्या तयारीत असून 'खासगी शिकवणी वर्ग नोंदणी व विनियमन अधिनियम, २०२६' तयार करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत दिली. येत्या अधिवेशनात या संदर्भातील विधेयक सभागृहात मांडण्यात येणार असल्याचे त्यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले.

विधान परिषदेचे आमदार मनिषा कायंदे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना भुसे यांनी राज्यातील खासगी शिकवणी वर्गांवर सरकारच्या वतीने नियंत्रण ठेवण्यासाठी कायदा करीत असल्याचे सांगितले. जानेवारी २०२४ मध्ये केंद्र सरकारने कोचिंग संस्थांसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्या नियमांचा तसेच इतर राज्यांतील कायद्यांचा अभ्यास करून महाराष्ट्रासाठी स्वतंत्र नियमावली तयार केली जात आहे. या कायद्याअंतर्गत खासगी क्लासेसची अनिवार्य नोंदणी, उपलब्ध सुविधा, वर्गांच्या वेळा, शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, जाहिरातींचे निकष आणि विद्यार्थी-पालकांना दिल्या जाणाऱ्या माहितीचे नियमन करण्यात येणार आहे.

लक्षवेधी मांडताना आमदार कायंदे यांनी अनेक कोचिंग क्लासेसकडून खोट्या यशोगाथा, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि निकालांचा चुकीचा वापर करून विद्यार्थी व पालकांची आर्थिक फसवणूक होत असल्याचा (पान ४ वर)

## तुकाराम मुंढेंची गोरस भांडारवरील कारवाई बेकायदेशीर

### नागपूर खंडपीठाचा महत्वपूर्ण निर्णय; निलंबित केलेला परवाना त्वरित बहाल करण्याचे कोर्टाचे निर्देश

नागपूर दि.७ (प्रतिनिधी)- वर्धातील सुप्रसिद्ध गोरस भांडारवरील एफडीएची कारवाई बेकायदेशीर असल्याचा महत्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाने दिला आहे. एफडीएने निलंबित केलेला परवाना त्वरित बहाल करण्याचे निर्देशही खंडपीठाने दिले आहे. त्यामुळे तुकाराम मुंढे आणि त्यांच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या विरोधात गोरस भांडारचा एक मोठा विजय झाला आहे. तर एफडीएच्या कारवाईला मोठा दणका देण्यात आला आहे.

दरम्यान, ३१ मे रोजी अन्न व औषध प्रशासन विभागाने गोरस भंडारवर धाड टाकत तिथे अस्वच्छता असल्याचे कारण देत परवाना निलंबित केला होता. एफडीएच्या कारवाईमुळे गोरस भंडारला लाखो रुपयांचा नुकसान होऊन ९ लाख रुपयांचे दुग्धजन्य उत्पादन फेकून द्यावे लागले होते. (पान ४ वर)

## पावसाचा अंदाज पाहूनच पेरणीचा निर्णय घ्या-दत्तात्रय भरणे

### बियाणे-खतांचा पुरेसा साठा उपलब्ध, काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- राज्यात अनेक भागांत मुसळधार पाऊस सुरू असला तरी काही ठिकाणी अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी स्थानिक पावसाची परिस्थिती आणि हवामानाचा अंदाज लक्षात घेऊनच पेरणीचा निर्णय घ्यावा, असे आवाहन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे. तसेच राज्यात बियाणे आणि खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असून काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

कृषिमंत्री भरणे म्हणाले की, सध्या राज्यातील अनेक भागांत जोरदार पाऊस पडत आहे. विशेषतः मुंबई आणि कोकण विभागात पावसाचे प्रमाण अधिक आहे. मात्र, नाशिक विभागात तुलनेने कमी पाऊस झाला असून आजच्या हवामान अंदाजानुसार त्या भागातही पावसाची शक्यता आहे.

याच पार्श्वभूमीवर त्यांनी शेतकऱ्यांना घाईघाईने पेरणी न करण्याचा सल्ला दिला. ''ज्या भागात अद्याप पुरेसा पाऊस झालेला नाही, त्या भागातील शेतकऱ्यांनी स्थानिक परिस्थिती आणि पावसाचा अंदाज घेऊनच पेरणीचा निर्णय घ्यावा,'' असे ते म्हणाले.

राज्यात बियाणे आणि खतांचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करत भरणे यांनी सांगितले की, शासनाकडे आवश्यक प्रमाणात बियाणे आणि खतांचा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरण्याचे (पान ४ वर)

## आरटीओतील कथित गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी; दोषींवर कठोर कारवाई केली जाईल-मुख्यमंत्री

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) विभागातील कथित गैरव्यवहार, कर चुकवेगिरी आणि अनियमिततांच्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

सदस्य विजय वडेट्टीवार यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यासंदर्भात परिवहन मंत्र्यांशी चर्चा केली असून, सभागृहातील सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विषयावरील चर्चेला उत्तर देताना यासंदर्भातील सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, महागड्या लक्झरी वाहनांच्या नोंदणीसंदर्भात काही प्रकरणांमध्ये कर चुकवेगिरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. काही वाहनमालक (पान ४ वर)

## वायनाडमध्ये बोगद्याचे काम सुरू असतानाच दरड कोसळली; २ कामगारांचा मृत्यू

वायनाड दि.७ (वृत्तसंस्था)- केरळमधील वायनाड जिल्ह्यात मंगळवारी मुसळधार पावसामुळे एक मोठी दुर्घटना घडली आहे. बोगद्याचे काम सुरू असतानाच कामाजवळ भीषण दरड कोसळली असून, यामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर परिसरात युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले असून, अजूनही अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मल्लपुरम आणि वायनाड जिल्ह्याला जोडणाऱ्या 'अनाक्कमपोईल-मेप्पाडी बोगदा रस्ता' प्रकल्पाचे काम सुरू असलेल्या कल्लाडी येथील मीनाक्षी पुलाजवळ ही घटना घडली. दरड कोसळली तेव्हा घटनास्थळावर अनेक बांधकाम कामगार उपस्थित होते.



घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली आणि काही लोकांना सुखरूप बाहेर काढले. सध्या ढिगाऱ्याखाली सुमारे १० जण अडकल्याची भीती अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. तर अपघातात जखमी झालेल्या ६ जणांना उपचारासाठी तातडीने (पान ४ वर)

## मी मौन धारण केले आहे, परंतु, माझ्यावर केलेले आरोप तथ्यहीन-चंपत राय

अयोध्या दि.७ (वृत्तसंस्था)- अयोध्येतील प्रभू श्रीरामाच्या मंदिरातील देणगीच्या अपहार प्रकरणात श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने चंपत राय आणि अनिल मिश्रा यांचा राजीनामा मंजूर केला. यानंतर कृष्ण मोहन यांच्यावर हंगामी जबाबदारी देण्यात आली आहे. ट्रस्टने राजीनामा मंजूर करताच चंपत राय यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. मी मौन धारण केले आहे. परंतु, माझ्यावर केलेले आरोप तथ्यहीन आहेत, असे चंपत राय यांनी म्हटले आहे.

चंपत राय यांनी रामभक्तांना उद्देशून एक पत्र जारी केले आहे. ७ जून २०२६ पासून श्री राम जन्मभूमी मंदिर परिसरातील देणग्यांची मोजणी करताना झालेल्या कथित चोरीसंदर्भात विविध चर्चा सुरू आहेत. माझ्यावर वैयक्तिकरित्या अनेक निराधार आरोप करण्यात आले आहेत. मी मौन बाळगले आहे. ६ जुलै रोजी मंदिर ट्रस्टच्या बैठकीत सादर करण्यात आलेला एसआयटीचा प्राथमिक अहवाल सुरुवातीला गुप्त ठेवण्यात आला होता. परंतु, आता तो सार्वजनिक करण्यात (पान ४ वर)

# व्हॉट्सॲपवर 'युजरनेम': ओळख नवी अन् धोकेही नवे!

जगभरात तीन अब्जांहून अधिक लोक वापरत असलेल्या व्हॉट्सॲपमध्ये लवकरच एक महत्त्वाचा बदल होण्याची शक्यता आहे. या नव्या सुविधेनुसार वापरकर्त्यांना त्यांच्या मोबाईल नंबरऐवजी स्वतंत्र युजरनेम तयार करता येणार आहे. या युजरनेमच्या आधारे इतर वापरकर्ते त्यांच्याशी संपर्क साधू शकतील. त्यामुळे प्रत्येक वेळी मोबाईल नंबर शेअर करण्याची गरज राहणार नाही. गोपनीयतेच्या दृष्टीने हा बदल महत्त्वाचा मानला जात असला, तरी त्याचबरोबर स्पॅम, बनावट ओळख आणि ऑनलाइन फसवणुकीच्या नव्या शक्यताही यामुळे निर्माण होऊ शकतात.

आजपर्यंत व्हॉट्सॲपवर कोणाशीही संवाद साधण्यासाठी त्याचा मोबाईल नंबर आवश्यक होता. त्यामुळे अनेकदा अनोळखी व्यक्तींनाही आपला नंबर उपलब्ध होत असे. विशेषतः ग्रुपमध्ये सहभागी झाल्यानंतर सर्व सदस्यांचे मोबाईल नंबर एकमेकांना दिसत असल्याने वैयक्तिक माहिती सहजपणे इतरांपर्यंत पोहोचत होती. त्यातून अनावश्यक कॉल, जाहिरातींचे संदेश, स्पॅम आणि विविध प्रकारच्या फसवणुकीच्या घटना वाढल्याचे अनेकदा समोर आले आहे. अशा परिस्थितीत मोबाईल नंबरऐवजी युजरनेमचा पर्याय उपलब्ध करून देण्यामागे वापरकर्त्यांची गोपनीयता अधिक मजबूत करण्याचा कंपनीचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

ही सुविधा विशेषतः महिला, पत्रकार, डॉक्टर, वकील, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्या व्यक्तींसाठी उपयुक्त ठरू शकते. अशा व्यक्तींना अनेकदा अपरिचित लोकांशी संपर्क साधावा लागतो. त्यासाठी स्वतःचा मोबाईल नंबर द्यावा लागल्याने अनावश्यक संदेश आणि कॉलचा त्रास सहन करावा लागतो. युजरनेमच्या माध्यमातून संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध झाल्यास मोबाईल नंबर गोपनीय ठेवणे शक्य होईल आणि वैयक्तिक सुरक्षिततेलाही बळ मिळेल. कमात्र या सुविधेची दुसरी बाजूही तेवढीच महत्त्वाची आहे. मोबाईल नंबर ही प्रत्येक व्यक्तीची निश्चित ओळख असते; परंतु युजरनेम वापरकर्ता स्वतःच्या पसंतीने तयार करू शकतो. त्यामुळे एखादा सायबर गुन्हेगार एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीच्या, बँकेच्या अधिकाऱ्याच्या, डॉक्टरच्या किंवा पत्रकाराच्या नावाशी साधर्म्य असलेला युजरनेम तयार करून लोकांचा विश्वास संपादन करू शकतो. त्यानंतर खोट्या आश्वासनांच्या किंवा बनावट योजनांच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक करण्याची शक्यता वाढू शकते. त्यामुळे युजरनेमवरून समोरची व्यक्ती खरी आहे की बनावट, याची खात्री करणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.


गेल्या काही वर्षांत डिजिटल माध्यमांद्वारे होणाऱ्या आर्थिक फसवणुकीमध्ये मोठी वाढ झाली आहे. बँक अधिकारी, पोलीस, न्यायालय किंवा शासकीय संस्थांचे नाव सांगून नागरिकांची फसवणूक करण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. अशा वेळी युजरनेमचा आधार घेत बनावट ओळख निर्माण करणे गुन्हेगारांसाठी अधिक सोपे होऊ शकते. त्यामुळे ही सुविधा जितकी उपयुक्त आहे, तितकीच तिचा गैरवापर होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. काही तज्ज्ञांच्या मते, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम आणि फेसबुक या सर्व सेवा एकाच कंपनीच्या मालकीच्या असल्यामुळे भविष्यात तिन्ही व्यासपीठांवर एकच युजरनेम वापरण्याची व्यवस्था निर्माण होऊ शकते. यामुळे वापरकर्त्यांची ओळख अधिक सुसंगत होईल; मात्र त्याच वेळी विविध माध्यमांवरील माहिती एकत्रित करून त्याचा व्यावसायिक कारणांसाठी वापर होण्याबाबतही काही तज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. कंपनीने मात्र वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचे संरक्षण हेच आपले प्रमुख उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट केले आहे.

व्हॉट्सॲपने या सुविधेबाबत काही महत्त्वाच्या बाबी स्पष्ट केल्या आहेत. कंपनीच्या म्हणण्यानुसार, वापरकर्त्यांच्या युजरनेमची कोणतीही सार्वजनिक डिरेक्टरी उपलब्ध करून दिली जाणार नाही. त्यामुळे ज्यांच्याकडे तुमचा युजरनेम असेल, त्यांनाच तुमच्याशी संपर्क साधता येईल. याशिवाय सर्व संदेश आणि कॉल पूर्वीप्रमाणेच 'एन्ड-टू-एन्ड एन्क्रिप्शन'द्वारे सुरक्षित राहतील. म्हणजेच संवादातील माहिती तिसऱ्या व्यक्तीला पाहता किंवा ऐकता येणार नाही.भारतात व्हॉट्सॲप हे केवळ संवादाचे साधन राहिलेले नाही. शिक्षण, व्यवसाय, बँकिंग, शासकीय सेवा, आरोग्य, प्रसारमाध्यमे आणि वैयक्तिक व्यवहार अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे या व्यासपीठावरील कोणताही बदल कोट्यवधी नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा ठरतो. त्यामुळे या सुविधेची अंमलबजावणी करण्यापूर्वी तिच्या सुरक्षिततेची, तांत्रिक विश्वासार्हतेची आणि संभाव्य परिणामांची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे. नवीन सुविधा वापरताना वापरकर्त्यांनीही काही गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. केवळ युजरनेम पाहून कोणावरही विश्वास ठेवू नये. आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी संबंधित व्यक्तीची ओळख दुसऱ्या माध्यमातून निश्चित करून घ्यावी. संशयास्पद संदेश, अज्ञात लिंक किंवा आकर्षक आमिषांना बळी पडू नये. आवश्यक वाटल्यास संबंधित व्यक्तीशी प्रत्यक्ष किंवा दूरध्वनीद्वारे संपर्क साधून माहितीची खातरजमा करावी. सायबर सुरक्षेबाबत जागरूकता हीच अशा फसवणुकीपासून बचाव करण्याची सर्वात प्रभावी उपाययोजना आहे.

तंत्रज्ञानाचा प्रत्येक बदल हा माणसाच्या सोयीसाठी असतो; मात्र प्रत्येक नव्या सुविधेसोबत काही नवी आव्हानेही निर्माण होत असतात. मोबाईल नंबरऐवजी युजरनेम वापरण्याची सुविधा गोपनीयतेच्या दृष्टीने निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु तिची अंमलबजावणी किती सुरक्षित आणि जबाबदारीने केली जाते, यावरच तिचे यश अवलंबून असेल. कंपनीची मजबूत सुरक्षा व्यवस्था, सरकारचे प्रभावी नियमन आणि वापरकर्त्यांची सजगता या तिन्ही गोष्टींचा योग्य समन्वय साधला गेला, तर ही सुविधा डिजिटल संवाद अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवू शकेल. अन्यथा गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी सुरू झालेला हा बदलच स्पॅम, बनावट ओळख आणि फसवणुकीसाठी नवे दार उघडण्याची भीती नाकारता येणार नाही.

# बेवारस मृतदेह; ओळख पटविण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) -येथील रेल्वेस्टेशनच्या फोर व्हिलर पार्किंगमध्ये दो.१ रोजी मध्यरात्रीनंतर १ वा. १५ मि.



सुमारास अनोळखी उसम बेशुद्ध अवस्थेत आढळुन आला. त्यास घाटी रुग्णालयात दाखल केले असता त्यास मृत घोषीत करण्यात आले. मयत इसम हा अनोळखी असून त्याची ओळख पटविण्याचे आवाहन वेदांत नगर पोलीस स्टेशनचे तपासी अंमलदार जी.एस. चेळेकर यांनी केले आहे.

मयताचे वर्णनः वय अंदाजे ४५ वर्षे, रंग गोरा, नाक सरळ, डोळे काळे, केस काळे पांढरे, चेहरा लांबट, अंगात पॅण्ट शर्ट (पांढरी फुले असलेला शर्ट) वरील वर्णनाच्या इसमाबाबत काही माहिती कळाल्यास वेदांत नगर पोलीस स्टेशनच हवालदार जी.एस. चेळेकर यांच्याशी ८६६८४७५४१२ अथवा ०२४०-२३५१३३३ वर संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६

# कर्जमुक्तीमुळे मराठवाड्यातील शेतीला मिळणार नवी उभारी

'शेतकरी समृद्ध तर राज्य समृद्ध' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' जाहीर केली आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देऊन त्यांना नव्याने शेती करण्यासाठी सक्षम करणे आणि कृषी क्षेत्राला नवी ऊर्जा देणे हा या योजनेमागील मूलभूत उद्देश आहे.

मराठवाडा हा दुष्काळ, अवर्षण, अतिवृष्टी आणि हवामान बदलाच्या सततच्या संकटांना सामोरा जाणारा प्रदेश आहे. अनियमित पाऊस, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार आणि नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने राबविलेली ही कर्जमुक्ती योजना मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरणार आहे.

योजनेअंतर्गत पात्र थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीककर्जाची कर्जमुक्ती दिली जाणार आहे. तसेच दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (ओटीएस) योजना राबविण्यात येणार आहे. त्यामुळे मोठ्या थकबाकीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळणार आहे. या योजनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही न्याय देण्यात आला आहे. वेळेवर




कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे प्रामाणिक कर्जफेडीला प्रोत्साहन मिळेल आणि आर्थिक शिस्तही वाढीस लागेल.

जुलै २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. पहिल्या टप्प्यात थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने रक्कम वितरित केली जाईल. त्यामुळे लाभार्थ्यांना कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट लाभ मिळणार आहे.

योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि प्रभावी व्हावी यासाठी राज्यभरात आवश्यक प्रक्रिया वेगाने सुरू आहे. मराठवाड्यातील आपले सरकार सेवा केंद्र (सीएससी) आणि महा-ई-सेवा केंद्रांवर पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण सुरू आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांकडून पात्र कर्जदारांची माहिती शासनाच्या अधिकृत पोर्टलवर अपलोड करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

या योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी काही बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे. आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न असणे, केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे, सीएससी केंद्रावर बायोमेट्रिक प्रमाणीकरण करून त्याची पावती जपून ठेवणे या बाबी वेळेत पूर्ण केल्यास लाभ मिळण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

योजनेचा लाभ १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदतीच्या पीककर्जासाठी लागू आहे. संबंधित कर्ज ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असावे आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड झालेली नसावी. या निकषांची पूर्तता करणारे पात्र शेतकरी कर्जमुक्तीसाठी पात्र ठरणार आहेत.

या योजनेचा लाभ छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, नांदेड, धाराशिव आणि हिंगोली या मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांना मिळणार आहे.

कर्जमुक्तीमुळे शेतकरी पुन्हा नव्याने पीककर्ज घेऊ शकतील, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करू शकतील आणि शेतीमध्ये अधिक गुंतवणूक करण्याचा आत्मविश्वास मिळवू शकतील.

कर्जमुक्ती ही केवळ आर्थिक मदत नसून शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासाला नवी उभारी देणारे पाऊल आहे. शासनाच्या या निर्णयामुळे मराठवाड्यातील हजारो कुटुंबांना दिलासा मिळेल, शेतीची उत्पादकता वाढेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळेल. शेतकरी सक्षम झाला तरच कृषी क्षेत्र सक्षम होईल आणि कृषी क्षेत्र सक्षम झाले तर राज्याच्या विकासाला अधिक बळ मिळेल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ही त्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टीचे पाऊल ठरणार आहे.

**संकलन- विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

# संभाजीनगरमधील शाळेतील भीषण घटना

शिक्षक विद्यार्थी या नात्याला कलंक लावणारी घटना नुकतीच छत्रपती संभाजीनगर येथे घडली आहे. टी.सी. घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्याने मुख्याध्यापक यांच्या दालनामध्ये, त्यांच्या उपस्थितीत वर्ग शिक्षकांच्या पोटात सुरा खुपसला. हा सुरा त्याने ऑनलाईन मागवला होता असे पोलिसांचे म्हणणे आहे.

वर्ग शिक्षकांचा टी.सी. देण्याशी काहीही संबंध नव्हता. हा विद्यार्थी शाळेत असताना अनुत्तीर्ण झाला होता. वर्ग शिक्षकांमुळे तो अनुत्तीर्ण झाला,किंवा वर्ग शिक्षकांनी त्याला मुद्दाम नापास केले असा त्याचा समज आहे. ज्या विषयात तो नापास झाला ते विषय वर्गशिक्षक शिकवत नव्हते. केवळ संशयामुळे ही भीषण घटना घडली आहे. हा वर्गशिक्षक रुग्णालयात असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. आरोपी विद्यार्थी अल्पवयीन असल्यामुळे तूर्त त्याची रवानगी सुधार गृहात करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील एकूण शिक्षण व्यवस्थेबद्दल काळजी वाटणारी ही घटना आहे. विद्यार्थी सर्रास ऑनलाइन सुरा मागवू शकतात ही अधोगती आहे.

अभ्यास न केल्यामुळे नापास होणे या संपूर्ण घटनाक्रमात वर्ग शिक्षकाचा कुठेही संबंध येत नाही. मुद्दाम नापास करण्याची शाळांची कधीच परंपरा नसते. असे असूनही केवळ वर्ग शिक्षकांवरील संशय आणि रागामुळे ही अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. विद्यार्थ्याने शिक्षकाला याप्रकारे मारणे ही अपवादात्मक घटना असून कायद्यानुसार योग्य ती कारवाई नक्की होईल. तथापि जो शिक्षक याचा बळी ठरला आहे,त्याच्यावर ओढवलेल्या प्रसंगाची निंदा करावी तितकी कमीच आहे. न केलेल्या कृत्याची त्याला विनाकारण शिक्षा झाली आहे. वृत्तपत्रे आणि न्यूज चॅनेल्सने या घटनेला व्यापक प्रसिद्धी दिलेली असल्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ही बातमी पसरली आहे. शिक्षकांची सुरक्षितता हा विषय नव्याने या निमित्ताने समोर आला आहे.

शाळेमध्ये केलेले चांगले संस्कार पूर्णपणे विसरून या विद्यार्थ्याने ही वाईट कृती केली आहे, यासाठी समाज माध्यमे, टीव्ही यावरील हिंसक मालिका निश्चितपणे जबाबदार आहेत. शिक्षकाचा राग आल्यामुळे त्याला संपवण्यापर्यंत मानसिकता जाते ही चिंताजनक बाब आहे. या घटनेतील विद्यार्थ्यासोबतच त्याचे पालकही यासाठी तितकेच जबाबदार आहेत. विद्यार्थ्याच्या मनात असलेला गोंधळ दूर करण्याचे काम पालक करू शकले नाहीत हे दुर्दैव.

एकूण शिक्षण पद्धतीमध्ये संस्काराचे महत्त्व या घटनेमुळे मोठ्या प्रमाणावर अधोरेखित होत आहे. मूल्य व्यवस्था, बरं वाईट यांचे परिणाम, यासारख्या संस्काराची नव्याने उजळणी करण्याची आता गरज आहे. इयत्ता कोणतीही असली तरी या संस्काराची आता गरज निर्माण झाली आहे हे नक्की.

विद्यार्थी अल्पवयीन असल्यामुळे कदाचित त्याला होणारी शिक्षा अत्यल्प असेल. शेवटी पोलीस कारवाईलाही कायद्याच्या चौकटीचे बंधन आहे. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या वर्ग शिक्षकाला या घटनेचे परिणाम आयुष्यभर भोगावे लागतील. ज्या घटनेमध्ये त्याची काहीही चूक नाही अशा घटनेसाठी त्याला जबाबदार धरून बळीचा बकरा करण्यात आलेले आहे. शिक्षण क्षेत्रातील सर्व जाणकारांनी, मानसशास्त्रज्ञ यांनी या घटनेची कारणमीमांसा करून उपाय शोधण्याचा प्रयत्न करावा,यासाठी उपाय सांगावेत ही अपेक्षा आहे. वर्ग शिक्षकाची प्रकृती लवकरात लवकर ठीक होऊन त्याचे रुटीन सुरू होण्यासाठी शुभेच्छा.

**-डॉ. अभय मंडलिक**

# ...तर, मराठी भाषा २१५० अखेर नामशेष होईल!
# मराठी भाषा : अस्तित्वाचा संघर्ष आणि गरज

**महाराष्ट्र** ही संतांची, साहित्यिकांची आणि बहुभाषिक समृध्दतेची भूमी. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते पु. ल. देशपांडे यांच्यापर्यंत अनेक दिग्गजांनी मराठी भाषेचा अभिमान जपला, पण आजच्या महाराष्ट्रात भाषेचा विषय अभिमानापेक्षा राजकारणाचा आणि दिखाऊ घोषणांचा भाग बनला आहे. मागील काही वर्षांत शासनाकडून मराठी भाषा वाचवण्यासाठी अनेक शासकीय निर्णय (जीआर) घेतले गेले - दुकाने आणि आस्थापनांवर मराठी फलक बंधनकारक करणे, सरकारी कार्यालयात मराठीचा वापर सक्तीचा करणे, शालेय आणि व्यावसायिक शिक्षणात मराठीला स्थान देण्याचे आदेश देणे, स्पर्धा परीक्षा मराठीतून उपलब्ध करून देणे - हे सगळे उपाय चांगले वाटतात. पण यामागे एक मोठा प्रश्न आहे - या निर्णयांची अंमलबजावणी कितपत प्रामाणिक आहे?

मुंबई महापालिकेच्या २०२३ च्या पाहणीत स्पष्ट झाले की मुंबईतील केवळ ४७% दुकाने योग्य मराठी फलक लावतात. राज्यभरातील सुमारे ८५% शासकीय कागदपत्रे अजूनही इंग्रजीत तयार होतात. कोर्टांमध्ये ९५% सुनावण्या इंग्रजीत होतात आणि नागरिकांना मराठीत न्याय मिळवणे अजून कठीण आहे. शिक्षणाच्या बाबतीतही परिस्थिती वेगळी नाही. व्यावसायिक अभ्यासक्रम मराठीत सुरू करण्याची घोषणा झाली असली तरी ७०% विद्यार्थ्यांना मराठीतून दर्जेदार पुस्तके उपलब्ध नाहीत. स्पर्धा परीक्षांसाठी मराठीत पुरेशी सामग्री नसल्यामुळे मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना अजूनही इंग्रजी पुस्तकांकडे धाव घ्यावी लागते.

या सगळ्याचा अर्थ असा की जीआर काढले जात आहेत, पण प्रत्यक्षात ते वरवरच्या स्तरावरच मर्यादित राहिले आहेत. मराठीचा वापर केवळ फलकांपुरता, सण-समारंभांपुरता आणि सरकारी कागदपत्रांच्या शीर्षकांपुरता राहतोय, पण शिक्षण, न्यायव्यवस्था, व्यवहार आणि दैनंदिन जीवनात अजूनही मराठी दुय्यम ठरत आहे. हे म्हणजे फक्त मराठीची बडिमुखी करायची आणि प्रत्यक्षात इंग्रजीला हात जोडायचे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार मातृभाषेत शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे, पण महाराष्ट्रात त्याची अंमलबजावणी अर्धवट आहे. व्यावसायिक शिक्षणासाठी मराठी पुस्तके, तांत्रिक शब्दसंपदा आणि प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध नाहीत.

**- डॉ. भारत कऱ्हाड**

त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमात मराठी टिकत नाही आणि विद्यार्थी इंग्रजीकडे वळतात. राजकीय पक्ष भाषेच्या नावावर आंदोलनं करतात, भाषिक अस्मितेचे नारे देतात, पण तेच नेते स्वतःच्या प्रचारासाठी इंग्रजी वापरतात, स्वतःच्या मुलांना इंग्रजी शाळेत घालतात आणि सरकारी कामकाज इंग्रजीतच चालवतात. भाषेचा उपयोग फक्त मतं मिळवण्यासाठी आणि प्रसंगी जनतेला भावनिक बनवण्यासाठीच होतोय का, हा गंभीर प्रश्न आता पडतो आहे.

जर आपण सध्याच्या परिस्थितीवर तातडीने उपाययोजना केली नाही, तर मराठी भाषेला भविष्यात मोठा धोका निर्माण होईल. यूनेस्कोच्या जागतिक भाषाविषयक अहवालानुसार, जर एखाद्या भाषेचा वापर नवीन पिढीमध्ये घटला, तर त्या भाषेला तीन ते चार पिढ्यांत म्हणजे सुमारे ७५ ते १०० वर्षांत अस्तित्व संकट येऊ शकते. जगात सध्या दर पंधरा दिवसांनी एक भाषा लुप्त होते. २१०० पर्यंत सुमारे ५०% भाषा नामशेष होतील, असा अंदाज जागतिक तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. सध्याचा मराठी भाषेचा वापर आणि त्यातील घसरणीचा वेग बघता, जर सध्याचं धोरण आणि निष्क्रियता अशीच चालू राहिली, तर मराठी भाषेला २१००-२१५० या काळात अस्तित्वाचा गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

म्हणूनच मराठी भाषा वाचवण्यासाठी तातडीने काही ठोस आणि व्यवहार्य पावलं उचलणं अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम शालेय शिक्षणात मातृभाषेला खऱ्या अर्थाने प्राधान्य दिलं पाहिजे. सर्व शाळांमध्ये, अगदी इंग्रजी माध्यमांमध्येही मराठी विषय सक्तीचा करावा आणि त्या शिकवण्याची गुणवत्ता वाढवावी. सर्व सरकारी व्यवहार, कागदपत्रे, आणि आदेश मराठीत असावेत आणि मराठीतूनच नागरिकांना सेवा दिली जावी. न्यायालयीन कामकाज जिल्हास्तरावर मराठीतच करणे बंधनकारक करावे, आणि न्यायालयीन निकाल, प्रपत्रे, अर्ज मराठीत उपलब्ध करून द्यावीत. व्यावसायिक आणि उच्च शिक्षण मराठीतून सहज आणि दर्जेदार पद्धतीने मिळाले पाहिजे. स्पर्धा परीक्षांसाठी मराठीतून दर्जेदार अभ्यास साहित्य सहज उपलब्ध करून दिले पाहिजे. आज डिजिटल युगात मराठी भाषेला जागा मिळवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, म्हणून अधिकाधिक वेब पोर्टल्स, मोबाइल ॲप्स, ई-बुक्स, आणि तांत्रिक शब्दसंपदा मराठीत तयार करणे गरजेचे आहे. मराठी भाषेला वाचवायचे असेल तर फक्त नियम करून भागणार नाही. मराठीचा वापर घराघरात, रस्त्यावर, व्यवहारात, **पान ३ वर...**

# देशाच्या स्वातंत्र्यासाठी 'आझाद हिंद सेने'ची देशसेवा

**आझाद** हिंद सेना म्हणताच डोळ्यापुढे उभे राहतात ते देशाच्या स्वातंत्र्यासाठी जगाला गवसणी घालणारे नेताजी सुभाषचंद्र बोस ! आझाद हिंद सेना ही भारतीय पारतंत्र्याच्या काळात भारताची सेना होती. आझाद हिंद सेनेची स्थापना सुभाषचंद्र बोस यांनी दुर्सया महायुद्धाच्या काळात ५ जुलै १९४३ या दिवशी केली. ब्रिटिशांविरुद्ध लढा देण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४० सहस्र भारतीय स्त्री-पुरुषांच्या सहभागाने ही सेना स्थापन केली आणि 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूंगा' असे आवाहन केले. आझाद हिंद सेनेच्या स्थापनादिनाच्या निमित्ताने हा लेखप्रपंच

आपल्या देशाबाहेर पडून साडे तीन वर्षे उलटून गेलेल्या नेताजींना आपल्या मातृभूमीत परतायची अनिवार ओढ होती, पण त्यांना देशात प्रवेश करायचा होता तो शत्रूचा नि:पात करून व आपल्या मातृभूमीला दास्यमुक्त करून आपल्या सार्वभौम देशाचा एक सन्माननीय नागरिक म्हणून. गेली साडेतीन वर्षे केलेली अपार मेहनत व नियोजन आता फलस्वरुप होण्याची लक्षणे दिसू लागत होती, मात्र नेताजी म्हणजे दिवास्वप्न पाहणारा आशावादी मनुष्य नव्हता तर तो एक दृष्टा होता. संपूर्ण तयारीनिशी व ताकदीनिशी हल्ला चढवुन तो निर्णायक व यशस्वी होण्याची पूर्ण खात्री झाल्यावर मगच ते आपला निर्णायक घाव घालणार होते. आणि असा निर्णायक हल्ला यशस्वी होण्यासाठी केवळ सैन्य व शस्त्रे पुरेशी नसून आपल्या देशातील बांधवांचा आपल्या प्रयत्नाला मनापासून पाठिंबा असणे आवश्यक आहे हे त्यांनी ओळखले होते. किंबहुना जेव्हा आझाद हिंद सेना पूर्वेकडून परकिय सत्तेवर बाहेरून हल्ला चढवेल त्याच वेळी जागृत झालेली व स्वतंत्र्यासाठी सज्ज झालेली सर्वसामान्य भारतीय जनता आतून उठाव करेल व या दुहेरी पात्यांत परकियांचा निभाव लागणार नाही आणि नेमका तोच स्वातंत्र्याचा क्षण असेल हा नेताजींचा ध्येयवाद होता.

मात्र यासाठी आपल्या देशवासियांना आझाद हिंद सेना ही आपली मुक्तिसेना व स्वतंत्र हिंदुस्थानचे भावी सेनादल आहे अशी भावना होणे अत्यावश्यक आहे असे नेताजींना वाटत होते.

हे अत्यंत कठिण होते हेही त्यांना माहित होते.याचे कारण एकिकडे धूर्त इंग्रजांनी चालविलेला अपप्रचार आणि खोडसाळपणे आझाद हिंद सेनेचा उल्लेख अत्यंत तुच्छतापूर्वक 'जिफ्स' (जॅपनिज इन्स्पावर्ड फिफ्थ कॉलम्नीस्ट्स) असा करीत असत.त्यामुळे आझाद हिंद सेना हे जपान्यांचे हस्तक दल असुन ते जपानरूपी शत्रूला भारतावर आक्रमण करण्यास मदत करीत आहेत व त्यातुन त्यांना सत्तेची लालसा आहे असे वाटू लागेल, अर्थातच ही सेना नसून ते घरभेदी आहे असे मत तयार होईल.दुसरीकडे प्रस्थापित नेत्यांनी व काँग्रेस पक्षानेही नेताजी व आझाद हिंद सेना यांना आपले



म्हणण्यास नकार दिला होता व त्यांचा धिक्कारही केला होता. प्रत्यक्ष आपल्या मातृभूमीत ही परिस्थिती तर जगात आपल्या सेनेचे काय स्थान असेल ? काय प्रतिमा असेल ? आपल्या देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामास जागतिक पाठिंबा मिळिवणे अत्यंत महत्त्वाचे आहे हे नेताजींनी अभ्यासले होते. इतकेच नव्हे तर आपण व आपले सेनादल हे आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करीत असून या प्रयत्नात सर्व स्वातंत्र्यवादी अशियाई राष्ट्रे तसेच पाश्चिमात्य राष्ट्रे यांनी एक स्वातंत्र्योन्मुख राष्ट्र म्हणुन आपल्या मागे उभे राहिले पाहिजे ही नेताजींची महत्त्वाकांक्षा होती. एखाद्या व्यक्तिला वा संघटनेला पाठिंबा देणे वा व्यक्तिश: मदत करणे आणि युद्धात एखाद्या राष्ट्राने न्याय्य वाटणाऱ्या राष्ट्राची बाजु घेणे यांत जमीन - अस्मानाचा फरक होता. मुळात जेव्हा एखाद्या देशाचे सैन्य स्वत:चा संग्राम उभा करते आणि समविचारी राष्ट्रे त्याला पाठिंबा देतात तेव्हा ते संकेताला अनुसरुन असते.

आझाद हिंद सेना म्हणजे कुणी व्यक्तिगत लाभासाठी वा आपल्या ऐक्यासाठी उभारलेली मोहिम नव्हती तर ती एका संग्रामस्थ राष्ट्राची अस्मिता होती. आणि म्हणूनच तिला वा तिच्या पाठीराख्या मित्रराष्ट्रांना नेताजी बदनाम होऊ देणार नव्हते, तर ते आपला संग्राम युद्धनितीला व संकेताला अनुसरून आपला व आपल्या राष्ट्राचा हक्क मिळिवण्यासाठी न्याय्य मार्गाने लढणार होते. ज्या कारणास्तव शिवरायांनी राजमुकुटाची यत्किंचितही आसक्ती नसताना रायगडावर स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला आणि स्वराज्य स्थापनेची घोषणा केली, नेमक्या त्याच उद्देशाने नेताजींना आझाद हिंद चे हंगामी सरकार स्थापण्याचा निर्णय घेतला. इथे पुन्हा एकदा नेताजींवरील शिवचरित्राचा प्रभाव दिसुन येतो. आपले लष्कर म्हणजे कुणा लुटारूंची टोळी नव्हे, कुणा सत्ताबुभुक्षिताची फौज नव्हे, कुणी अत्याचारी जमाव नव्हे तर हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी वचनबद्ध आणि धेयासक्त असलेले देशभक्त संघटित होऊन व स्वत:च्या भावी स्वतंत्र राष्ट्राचे प्रातिनिधीक असे सरकार स्थापून साऱ्या जगाला ग्वाही देणार होते की आम्ही आमच्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी आमच्या राष्ट्रध्वजाखाली आमच्या सेनानीच्या अधिपत्याखाली उपलब्ध त्या सर्व मार्गांनी आणि सहकार्यांनी लढणार आहोत आणि हा संघर्ष आता स्वातंत्र्यप्राप्तीतच विलिन होईल. मार्च १९४५ पासून मित्रराष्ट्रांपुढे जपानची पीछेहाट होऊ लागली. ७ मे १९४५ ला जर्मनीने विनाअट शरणांगती पत्करली तर जपानने १५ ऑगस्ट या दिवशी शरणागतीची अधिकृत घोषणा केली. जपान-जर्मनीच्या या अनपेक्षित पराभवाने सुभाषचंद्रांच्या सर्व आशा मावळल्या. पुढील रणक्षेत्रासाठी सयामला जात असतांनाच १८ ऑगस्ट १९४५ रोजी फार्मोसा बेटावर त्यांचे बॉम्बर विमान कोसळून त्यांचा हदयद्रावक अंत झाला. आझाद हिंद सेनेच्या फौजा दिल्लीपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत, तरी त्या सेनेने जे प्रचंड आव्हान ब्रिटीश साम्राज्यशाहीसमोर उभे केले, त्याला इतिहासात तोड नाही. त्यामुळे ब्रिटीश सत्ता हादरली. भारतावर पुढे सत्ता गाजवणे कठीण जाईल, याची कल्पना इंग्रजांना आली. चाणाक्ष आणि धूर्त इंग्रज सरकारने भावी संकट ओळखल. पुढील मानहानी पत्करण्यापेक्षा हा देश सोडून जाण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला, अशी कबुली तत्कालीन ब्रिटीश पंतप्रधानांनी दिली होती. आझाद हिंद सेनेच्या सैनिकांच्या निस्वार्थ देशसेवेमुळे स्वातंत्र्यकांक्षा कोट्यवधी देशवासियांच्या मनात निर्माण झाली. नेताजींचे असीम साहस आणि तन, मन, धन यांचा त्याग केलेल्या आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना विनम्र अभिवादन !

संकलक : कु. प्रियांका लोणे,
मराठवाडा संघटक,
हिंदु जनजागृती समिती

# महाराष्ट्र गट-क संयुक्त मुख्य परीक्षेचे(१२ जुलै रोजी)आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दि. १२ जुलै २०२६ रोजी 'महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त मुख्य परीक्षा-२०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. ही परीक्षा छत्रपती संभाजीनगरमधील १५ शाळा व महाविद्यालयांच्या केंद्रांवर पार पडणार असून, यासाठी ४,८२४ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला आहे.

परीक्षा दोन सत्रांत होणार असून, सकाळचे सत्र सकाळी ११.०० ते १२.०० आणि दुपारचे सत्र दुपारी ०३.०० ते ०४.०० या वेळेत पार पडेल. परीक्षेच्या कामकाजासाठी ५१९ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उमेदवारांनी परीक्षेला येताना प्रवेशपत्रासोबत आधार कार्ड,निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.

सुधारित कार्यपद्धतीनुसार, परीक्षा सुरू होण्याच्या अर्धा तास आधी मुख्य प्रवेशद्वार बंद केले जाईल.

उशिरा येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. परीक्षा कक्षामध्ये मोबाइल, ब्लूटुथ, स्मार्टवॉच किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणास सक्त मनाई आहे. असे साहित्य आढळल्यास उमेदवारांवर फौजदारी आणि प्रशासकीय कारवाईसह त्यांना आगामी परीक्षांसाठी बंदी घालण्यात येईल.

उमेदवारांनी परीक्षेसाठी वेळेत म्हणजे सकाळी १० ते १०:३० वाजण्याच्या आत परीक्षा केंद्रावर पोहोचणे आवश्यक असल्याचे सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.

# महाराष्ट्र राज्य इमाव वित्त व विकास महामंडळांच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी पोर्टलवर अर्ज करा-जिल्हा व्यवस्थापक जे.झेड.राठोड

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या उपकंपनी असलेल्या आर्थिक विकास महामंडळांच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी www.msobcfdc.org या वेब पोर्टलवर अर्ज करावा,असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक जे.झेड. राठोड यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य इतार मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. तर्फे संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ, संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ, संत श्री संताजी महाराज आर्थिक विकास महामंडळ, संत श्री. रुपालाल महाराज आर्थिक विकास महामंडळ, स्व. विष्णूपंत राम्चंद्र दादरे (लोनारी) आर्थिक विकास महामंडळ, सोळा कुलस्वामीनी आर्थिक विकास महामंडळ, श्री संत शिरोमणी नामदेव महाराज समस्त शिंपी समाज आर्थिक विकास महामंडळ, संत भोजलिंग काका सुतार समाज आर्थिक विकास महामंडळ, लेवापाटीदार सस्माज आर्थिक विकास महामंडळ, सरदार वल्लभभाई पटेल गुजर समाज आर्थिक विकास महामंडळ, आगरी समाज आर्थिक विकास महामंडळ अशा विविध उपकंपन्यांमार्फत विविध विकासाच्या योजना राबविल्या जातात. त्यात वैयक्तिक व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, कौशल्य प्रशिक्षण विकास योजना, महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना, बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना अशा प्रमुख योजना ऑनलाईन प्रणालीद्वारे राबविल्या जातात. या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह या वेब पोर्टलवर अर्ज करावा.

अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ. मर्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवाजी हायस्कूलच्या बाजूला, दुसरा मजला, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर, दुरध्वनी ०२४०-२३४१५४४ संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक जे.झेड. राठोड यांनी केले आहे.

### राज्यभरातील महामार्गांवरील फलकांवरून 'औरंगाबाद', 'अहमदनगर'सारखी परकीय नावे हटवून

# 'छत्रपती संभाजीनगर', 'अहिल्यानगर' लिहिण्याचे सार्वजनिक बांधकाममंत्र्यांचे आदेश!

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) – राज्य शासनाने आपला गौरवशाली इतिहास जपण्यासाठी अनेक शहरांची परकीय आणि जुनी नावे पालटून त्यांना नवीन अधिकृत नावे दिली आहेत. यामध्ये 'औरंगाबाद'चे 'छत्रपती संभाजीनगर', 'अहमदनगर'चे 'अहिल्यानगर', 'उस्मानाबाद'चे 'धाराशिव', तसेच 'इस्लामपूर'चे 'ईश्वरपूर' आणि 'वेल्हे'चे 'राजगड' असे नामकरण करण्यात आले आहे; मात्र महामार्गांवरील दिशादर्शक फलकांवर अद्यापही औरंगाबाद, अहमदनगर, उस्मानाबाद अशी जुनीच आणि परकीय नावे सर्रास झळकत आहेत. ही जुनी नावे तत्काळ हटवून त्याजागी शासनाने मंजूर केलेली नवीन नावे लिहावीत, या मागणीसाठी हिंदु जनजागृती समितीच्या शिष्टमंडळाने सार्वजनिक बांधकाममंत्री श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

याची गंभीर दखल घेत मंत्री महोदयांनी 'ही नावे बदललीच पाहिजेत, यामध्ये तातडीने कारवाई झाली पाहिजे,' असे त्यांनी सांगितले. तसेच, यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना आदेश देऊन आजच कारवाई करण्यासाठी सांगतो, असे आश्वासनही त्यांनी दिले, अशी माहिती हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी दिली आहे.

अशाच प्रकारचे आदेश सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री श्री. इंद्रनील नाईक यांनीही दिले आहेत. राज्य शासनाने रीतसर शासन निर्णय व राजपत्र प्रसिद्ध करून या नवीन नावांना कायदेशीर मान्यता दिलेली आहे. एकदा राजपत्र काढून नावात बदल केल्यानंतर सर्व शासकीय दप्तरी आणि सार्वजनिक फलकांवर नवीन नावांचा वापर करणे प्रशासनाला कायदेशीररित्या बंधनकारक असते. असे असतानाही जुन्या नावांचे फलक तसेच ठेवणे, हा अधिकृत शासकीय निर्णयाचा एक प्रकारे प्रशासकीय अवमान आहे. मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीनुसार दिशादर्शक फलक अद्ययावत नसणे ही प्रवाशांची दिशाभूल असून, राजपत्रित आदेशाचे पालन न करणे ही संबंधित अधिकाऱ्यांची थेट 'कर्तव्यकसुरी' ठरते, असे समितीने निवेदनात सडेतोडपणे स्पष्ट केले आहे. दिशादर्शक फलकांवरील नावांचा हा विषय केवळ एका जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी लागू आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) आणि रस्ते विकास महामंडळ (MSRDC) यांनी जुने फलक हटवून नवीन नावे अद्ययावत करण्याबाबत तात्काळ 'परिपत्रक' काढावे, अशी आग्रही मागणी समितीने केली आहे. या वेळी निवेदन देताना समितीचे मुंबई येथील श्री. सतीश सोनार आणि श्री. रवींद्र नलावडे प्रामुख्याने उपस्थित होते.

# मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरणपत्र सादर करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – ज्या आस्थापनांवर २५ किंवा त्यापेक्षा अधिक लोक काम करतात अशा सर्व आस्थापनांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत आपल्याकडील मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरण पत्र ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे, असे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी कळवले आहे.

या आस्थापनांमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील केंद्र व राज्य शासन यांची सर्व कार्यालये, अंगिकृत उद्योग/ व्यवसाय/ महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद / पंचायत समिती, महानगर पालिका, नगरपालिका, तसेच खाजगी क्षेत्रातील २५ किंवा अधिक लोक काम करतात अशा सर्व आस्थापना, उद्योग, व्यापार , व्यवसाय, कारखाने यांचा समावेश होतो. अशा आस्थापनांना सेवायोजन कार्यालये (रिक्तपदाची सुचना देणे सक्तीचे) कायदा १९५९ व त्या अंतर्गत नियमावली १९६० नुसार त्रैमासिक विवरणपत्र नमुना ई-आर १ तिमाही संपल्यानंतर म्हणजेच जून – २०२६ अखेर ३० दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक आहे. या प्रमाणे नियोक्त्यांच्या लॉग-इन मध्ये विवरणपत्र www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यानुसार विवरणपत्र दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत सादर करावे.

**विवरणपत्र ऑनलाईन कसे सादर कराल?**

यासाठी www.rojgar.mahaswayam.gov.in वेबसाईट ओपन करुन एम्प्लॉयर (लीस्ट अ जॉब) वर क्लिक करुन एम्प्लॉयर लॉग इनमध्ये नियोक्त्यांचा युजर आय डी व पासवर्ड वापरुन लॉग इन करुन ई-आर रिपोर्ट मधील ई-आर १ या ऑप्शनवर क्लिक करुन ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.

यासाठी काही तांत्रिक अडचण आल्यास किंवा अधिकच्या सहाय्यासाठी सोमवार ते शुक्रवार रोजी सार्वजनिक सुट्या वगळून सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यत या कार्यालयाच्या (०२४०) २९५४८५९ दूरध्वनीवर संपर्क साधावा. विवरणपत्र सादर न करणाऱ्या आस्थापनांवर कायदेशीर कारवाई होऊ शकेल, याची नोंद घ्यावी असे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी कळिवले आहे.

# पवना नदीला पूर आल्याने नागरिकात घबराट



पुणे दि. ७ ( प्रतिनिधी ) – गेल्या पाच सहा दिवसांपासून पडत असलेल्या संततधार पावसाने पवनानदीला पूर आला असून नदीपात्रातील पाणी रस्त्यावर तसेच नागरी वस्त्यांमध्ये घुसल्याने नागरिकांमध्ये चांगलीच घबराट उडाली. सोमवारी पहाटे महादेव मंदीर आणि आसपासच्या परिसरात नदीचे पाणी हळूहळू वाढत जाऊन आठ ते नऊ च्या सुमारास संपूर्ण परिसर जलमय झाला. महादेव मंदिर, त्या समोरील पोलिस स्टेशनचे कार्यालय, आजुबाजुच्या वस्ती, सोसायट्यांमध्ये पाण्याची पातळी वाढत गेल्याने त्या भागातील सर्व रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले.

पिंपळे सौदागरला खेटूनच रहाटणी भागातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळील गंगानगर, पवनानगरमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली. नदीपात्राजवळील पाण्याने वेढलेल्या घरांमधील २५ ते ३० महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांना अग्नीशमन दलाच्या जवानांनी होडीतून पाण्याच्या बाहेर काढले.

याकामी अग्नीशमन दलाच्या विठ्ठल घुशे, श्रीकांत वैरागर, कैलास वाघेरे, किरण निकाळजे या जवानांनी विशेष परिश्रम घेतले. एकंदरीत पुरपरिस्थिती लक्षात घेता स्थानिक नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे, विठ्ठल नाना काटे यांनी तातडीने घटनास्थळी दाखल होत नदीपात्राजवळील रहिवाशांना अग्नीशमन दलाच्या जवानांच्या मदतीने होडीच्या साह्याने पाण्याबाहेर काढले. पुरग्रस्त नागरिकांना नगरसेविका डॉ. कुंदा भिसे आणि उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे यांनी ब्लँकेट, साड्या आणि बिस्कीटांचे वाटप केले.

# आयुष्यात येणाऱ्या प्रत्येकाच्या संघर्षाची कहानी म्हणजेच लढा काव्यसंग्रह

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – येथील 'वर्डलँड पब्लिशिंग हाऊस'तर्फे 'लढा' नावाचा ठा. धोंडिरामसिंह राजपूत लिखित 'स्त्री' साहित्यावर आधारित काव्यसंग्रह प्रकाशित होतोय, त्या निमित्ताने...

'लढा' काव्यसंग्रहातील एकेक कविता वाचू लागलो. साहित्यातील एका अनुभव संपन्न हाताने लिहिलेल्या कविता खूपच अर्थपूर्ण असून जीवनात घडून गेलेल्या प्रत्येक लढ्याचे वर्णन कवितेत दिसून येत होतं. त्यात मग स्त्रीच्या जीवनात येणारा लढा, शेतकऱ्याच्या जीवनातील लढा, अपंगाच्या जीवनातील लढा, शहिदांचा लढा, वृध्दपकाळातील लढा, युवकांचा लढा, सैनिकांचा लढा, शेतातील बांधाचा लढा, लेकीबाळीचा लढा, हुंड्याविरुद्ध लढा, आजाराशी लढा, समस्यांशी लढा, महागाईशी लढा, शहिदांचा लढा, वि. दा. सावरकरांचा लढा, बाबू गेणूंचा लढा, भोंदूगिरीविषयीचा लढा किंवा राजकारणातील लढा हे आणि असे अनेक 'लढे' किंवा 'संघर्ष' व्यवस्थितपणे काव्यसंग्रहात दिसून येतात. तसेच स्वच्छता, जलसंपत्ती, मुलींचे कर्तव्य, बापाचे कर्तव्य, देशभक्ती, ऑपरेशन सिंदूर, दैवीशक्ती, संस्कार, भ्रष्टाचार, बाप, मानवी धर्म, मराठी भाषा, पहिली शाळा, वटसावित्री पौर्णिमा, आई, महिला सक्षिमीकरण, बालमजूर, रक्तदान, अन्नभेसळ, शेतकरी जीवन, मोबाईलचा वापर, भाकरीचा मानकरी, स्वावलंबन, स्वदेशी वस्तू, आत्मनिर्भता, माहेर, भूक व अन्न असे विविध विषय काव्यसंग्रहात प्रामुख्याने मांडलेले दिसून येतात.




मी मुद्दामहून काव्यसंग्रहातील काही काव्यपंक्तीचा उल्लेख करू इच्छितो, ते म्हणजे स्त्रीत्वाला जन्म घेण्याआधीदेखील किती संघर्षातून जन्म घ्यावा लागतो, हे ठा. धोंडिरामसिंह राजपूत यांनी प्रखरपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. कवी म्हणतात,

**आई मला घे तुझ्या पदरात**
**नको मारू मला तुझ्या उदरात**
**आई बाबा मला जगी येऊ द्या...**
**तुम्ही पाहिले जग मला ही पाहू द्या...**

वरील काव्यपंक्ती वाचल्यानंतर डोळे भरून आल्याशिवाय राहत नाही. हेच कवीच्या लेखनाचे विशेष म्हणता येईल. तसेच 'नराधम' कवितेत कवी लिहितात,

महिला, मुली, बालिकांची दिवसाढवळ्या विटंबना
अत्याचार सांगण्यासाठी
होतसे त्यांची कुचंबना
झोपलेले सरकार झोपलेले कारभारी
याच राज्यात वाढली
नराधमाची व्यभिचारी

या पंक्तीच्या माध्यमातून स्त्रीची होणारी कुचंबना आणि सरकारचा बेजबाबदारपणा यावर कवीने लेखनीच्या माध्यमातून प्रहार केलेला दिसून येतो.

मराठवाडा ही साहित्यिकांची भूमी म्हणून ओळखली जाते. या भूमीने अनेक कवी लेखक मराठी साहित्यास दिले, ही परंपरा अनेक उत्तम साहित्यिकांनी जपलेली आहे. दर्जेदार आणि उत्तम साहित्य निर्मितीसाठी साहित्यिकांकडे विपुल अनुभव, वाचन, गहरी संवेदनशीलता व प्रभावी शब्दसंपदा असावी लागते. या गोष्टी दैवी देणं असतात. कवी ठा. धोंडिरामसिंह राजपूत यांना हे दैवी देणं लाभलेलं असून त्याचा प्रभावी वापर त्यांनी सामाजिक स्वास्थ्यासाठी केला आहे. प्रत्येक मनुष्याला जन्मापासून ते शेवटच्या श्वासापर्यंत विविध व्यक्ती, विचार आणि प्रतिकूल परिस्थितीशी 'लढा' द्यावाच लागतो. प्रत्येक 'लढा' देर्णाया व्यक्तीसाठी अधिकचे बळ, दिशा व मदत या काव्यसंग्रहातून मिळेल असा विश्वास वाटतो.

ठा. धोंडिरामसिंह राजपूत हे कवी आणि लेखक तर आहेतच त्याबरोबरच ते एक उत्तम कर्ते समाजसेवक देखील आहे. ते मुळचे छ. संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर शहरात वास्तव्य करतात. स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीनंतर १९६७ साली त्यांनी लेखनाला सुरूवात केली. मोठमोठ्या साहित्यिकांच्या सहवासात ते घडत गेले.

तसेच विद्यार्थीकेंद्रीत शिक्षणाधिकारी म्हणून देखील त्यांची चौफेर ओळख आहे. आज ते सेवानिवृत्त असले तरी अनेक कार्यक्रम, सामाजिक क्षेत्रात त्यांचा सहभाग वाखाणण्याजोगा असतो. आजपर्यंत त्यांनी पन्नासच्या वरती पुस्तकं लिहलेली असून इयत्ता पाचवी 'स्टेट बोर्ड सुलभ मराठी' या पुस्तकात गेल्या दहा वर्षांपासून राज्यभर विद्यार्थी त्यांची 'बैल पोळा' कविता अभ्यासत आहेत. ठा. धोंडिरामसिंह राजपूत यांना सामाजिक कामानिमित्त महाराष्ट्र सरकारचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' व 'पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड समाजभूषण पुरस्कार' तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मिळालेला आहे.

ठा. धोंडिरामसिंह राजपूत लिखित 'लढा' काव्यसंग्रह विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, अभ्यासक या सर्वच घटकासाठी महत्त्वपूर्ण आहे. तो नक्कीच प्रत्येकाने अभ्यासावा, त्याचा नक्कीच वाचकाला उपयोग होईल. पुन्हा एकदा अनेक नवोदित साहित्यिकांना हक्काच व्यासपीठ देणारे, मार्गदर्शन, मदत करणारे संपादक मित्र बाबा चन्ने यांचेही खूप खूप कौतुक, अभिनंदन व खूप खूप शुभेच्छा. त्यांनी हे साहित्यकार्य अविरतपणे चालू ठेवावं. जेणे करून नवनवीन साहित्यिक घडतील आणि त्यांच्या साहित्याचा फायदा देशाला होईल. तसेच ठा. धोंडिरामसिंह राजपूत सरांना देखील पुढील साहित्य लेखनासाठी मनापासून शुभेच्छा. त्यांची लेखणी अशीच तेवत राहो, आणि अनेक उत्तमोत्तम व दर्जेदार साहित्य त्यांच्या हातून निर्माण होवो, हीच सदिच्छा. वयाच्या पंचाहत्तरव्या वर्षी देखील त्यांचा साहित्यप्रवास बघून खरच मन भरून आलं.



**– डॉ. विठ्ठलराव जाधव,**
(आय.पी.एस.), विशेष पोलिस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य. (से. नि.)

# महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी स्वीकारले 'चिंतातुर शेतकरी' काव्य संग्रह पुस्तक



वैजापूर, दि. ७ (प्रतिनिधी) – येथील द्रौपदी लान मधील एका धार्मिक कार्यक्रमात सुरेगाव ता.नेवासा येथील श्री संत सद्गुरु ब्रम्हलीन नारायणगिरी महाराज प्रतिष्ठाण व गुरूकुल आश्रमाचे महंत उद्धवजी महाराज मंडलिक यांनी आपल्या कीर्तनातून शेतकरी व्यथा सादर करून शेतकरी वर्गाच्या व्यथांना वाचा फोडण्यासाठी सर्वंकष प्रयत्न व्हावे असे प्रतिपादित केले.

हे औचित्य साधत येथील कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी लिहिलेले शेतकरी व्यथांच्या११२कविता असलेला काव्य संग्रह'चिंतातुर शेतकरी 'महंत उद्धवजी महाराज मंडलिक यांना प्रदान करून शेतकरी व्यथा बाबत आपण करीत असलेल्या जनजागृती बद्धल महाराजांचे ऋण व्यक्त केले व या काव्य संग्रहातील कविता आपणास सहाय्यभूत ठरतील अशी विनंती केली. या प्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र पा. साळुंके, ॲड. प्रमोद दादा जगताप, संजय बोरनारे, नगरसेवक व मर्चंट बँक माजी चेअरमन विशाल संचेती, साहेबराव पा. औताडे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक कल्याण पा,जगताप, शिक्षण सभापती बाबासाहेब पुतळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# ...तर, मराठी भाषा २१५० अखेर नामशेष होईल!....

पान २ वरून...

शिक्षणात आणि डिजिटल माध्यमांमध्ये वाढवला पाहिजे. मुलांमध्ये मराठी वाचनाची आणि संभाषणाची सवय लावली पाहिजे. पालकांनी घरी मुलांशी मराठीत बोलायला सुरुवात केली पाहिजे. खाजगी क्षेत्रात – बँका, मॉल्स, हॉटेल्स, ग्राहक सेवा केंद्रे – मराठी व्यवहार बंधनकारक करायला हवे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मराठीचा अभिमान बाळगताना इतर भाषांचा द्वेष करायचा नाही. मराठी भाषा वाचवण्यासाठी भाषिक सहिष्णुता राखली पाहिजे.

जर आपण आजच प्रयत्न केले आणि या सर्व क्षेत्रांमध्ये योग्य दिशेने काम सुरू केले, तर मराठीला फक्त वाचवता येणार नाही, तर ती २१५० पर्यंत आधुनिक आणि जागतिक भाषांमध्ये सन्मानाने वावरू शकेल. पण जर आपण निष्क्रिय राहिलो, तर पुढच्या ७५ ते १०० वर्षांत मराठीचा वापर व्यवहारातून आणि कुटुंबातून संपण्याची शक्यता आहे. फक्त सण-समारंभ, जुनी गाणी आणि आठवणीतच मराठी उरण्याचा धोका आहे. आज महाराष्ट्राला फक्त मराठी भाषा दिवस साजरा करून समाधान मानणाऱ्या लोकांची गरज नाही. महाराष्ट्राला हवी आहे अशी पिढी, जी मराठी मनापासून वापरेल, तिला आपले जीवनभाषा मानेल आणि इतर भाषांचा आदर राखत मराठीचा खरा अभिमान बाळगेल. पु. ल. देशपांडे यांच्या अमर वाक्याने आपल्याला हेच सांगायचे आहे – 'जी व्यक्ती आपल्या भाषेवर प्रेम करते, ती इतर कुणाच्याही भाषेचा द्वेष करू शकत नाही.' मराठी ही केवळ भाषा नाही, ती आपली संस्कृती आहे, आपली ओळख आहे. ती वाचवायची की हरवायची, हे आपण ठरवायचं.

# स्वच्छता पंधरवाडा २०२६: हर्सुल मध्यवर्ती कारागृह परिसरात मनपा आणि राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाची स्वच्छता मोहीम



छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) –सोमवारी झोन क्रमांक ४ (प्रभाग क्रमांक २) स्थित हरसुल मध्यवर्ती कारागृहाच्या मैदान परिसरात एक व्यापक सामूहिक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता पंधरवाडा २०२६ निमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मदतीने राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (एन एस ओ) छत्रपती संभाजीनगर क्षेत्रीय कार्यालय यांनी स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले.

या विशेष मोहिमेत राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (एन एस ओ) ने मुख्य आणि मार्गदर्शक भूमिका बजावली एन एस ओ चे निदेशक व क्षेत्रीय प्रमुख जयप्रकाश होनराव तसेच सांख्यिकी अधिकारी व कार्यालय प्रमुख मुकेश बाबू यांनी वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या आपल्या संपूर्ण टीमसह स्वतः मैदानात उतरून स्वच्छतेचे नेतृत्व केले. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या या अनुकरणीय सहभागाला महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाने उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली खांद्याला खांदा लावून खंबीर साथ दिली.

मनपाच्या वतीने शहर समन्वयक चेतन वाघ, स्वच्छता निरीक्षक रेणुका गायकवाड, अर्पिता शरद, प्रभाग इंचार्ज प्रसाद दांडगे, स्वच्छता जवान विजय साबळे, सुपरवायझर सतीश सोनवणे, सागर मगरे, मुजफ्फर पठाण आणि आयईसी (IEC) टीमचे मंजुषा पुरी, नितेश वाघ व अनुराग अहिरे यांनी सक्रिय उपस्थिती लावून ही संयुक्त मोहीम यशस्वी केली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# श्री संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्यात हजारो भाविकांनी घेतला चरणसेवेचा लाभ




छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- श्री संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्यानिमित्त पैठण येथील श्री संत एकनाथ महाराज मंदिर परिसरात हजारो वारकरी भाविकांसाठी चरणसेवा व मोफत वैद्यकीय सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. वारकरी संप्रदायातील 'सेवा हाच परमधर्म' या मूल्याला अनुसरून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तसेच शिवा ट्रस्ट संचलित यशवंतराव चव्हाण आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय आणि एमजीएम स्कूल ऑफ फिजिओथेरपी यांच्या संयुक्त विद्यमाने आज हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन श्री संत एकनाथ महाराजांचे वंशज श्री. रघुनाथ महाराज गोसावी (पालखीवाले) यांच्या हस्ते झाले. विविध प्रशासकीय, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपक्रमास भेट देऊन सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, यशवंतराव चव्हाण आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, एमजीएम स्कूल ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाचे पदाधिकारी, डॉक्टर, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच श्री. श्याम क्षीरसागर आणि श्री. गजानन कांबळे यांचे विशेष सहकार्य लाभले.

उपक्रमाचे प्रमुख समन्वयक डॉ. बालाजी गोरे, वैद्यकीय अधिकारी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, छत्रपती संभाजीनगर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय केले. वारकरी भाविकांना सुरक्षित, निरोगी आणि आनंददायी वारीचा अनुभव मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. समाजहितासाठी अशा सेवाभावी व आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन भविष्यातही सातत्याने करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# राम मंदिर गैरव्यवहार: ठाकरे गटाचे साधू-संतांना भेटण्याचे अभियान, खैरेंची घोषणा

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- आयोद्धतील राममंदिर उभारणीतील गैरव्यवहारांच्या सर्व बातम्यांची कागदपत्रे घेऊन राज्यातील साधूसंताना भेटण्याचे अभियान शिवसेनेच्या ठाकरे गटाने हाती घेतले आहे. हे काम माजी खासदार चद्रकांत खैरे यांच्याकडे सुर्पूद करण्यात आले आहे. बुधवारी परभणी जिल्ह्यातील नरेंद्र स्वामी महाराजांना भेटून या मोहिमेची सुरुवात करण्यात येईल असे खैरे यांनी बुधवारी पत्रकार बैठकीत जाहीर केले. या निमित्ताने शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या कार्यालयात आता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याबरोबर ' श्रीराम ' आणि ' हनुमाना 'ची मूर्तीही आवर्जून ठेवण्यात आली.

राम मंदिर आंदोलनाच्या आधारे ' हिंदूत्वा' चा मुद्दा भाजपने पुढे नेला. शिलन्यासापासून ते आंदोलनाच्या प्रत्येक टप्प्यावर रामभक्त म्हणून आपणही सहभागी झालो होतो. अयोद्धेमध्ये राम मंदिर उभा ठाकले तेव्हा त्याचा आपणास अभिमान वाटत होता. या आंदोलनातील सेवक म्हणून तेव्हा एक लाख ११ हजार १०१ रुपयांची देगणी दिली होती. अगदी आईनेही २५ हजार रुपये दिले होते. अनेकांनी निधी दिला. विदेशातूनही मोठा निधी आला. पण त्यात झालेल्या गैरव्यवहाराने मन व्यथित झाले. यातून ' हिंदू धर्माची ' बदनामी होत आहे. या सर्व प्रश्नावर साधू व संतांची भूमिका अधिक स्पष्ट व्हावी, त्यांनीही या प्रश्नी आवाज उठवावा म्हणून शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या वतीने मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या मोहिमेत परभणी जिल्ह्यातील नरेंद्र स्वामी महाराज तसेच गंगागिरी महाराज, शांतीगिरी महाराज, अण्णासाहेब मोरे महाराज यांची भेट घेणार असल्याचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी सांगितले. शिवसेना पक्ष प्रमुखांनी एक आंदोलन केले आणि ते आंदोलन संपले असे होणार नाही. या पुढे प्रत्येक गावात ' रामरक्षा ' आंदोलन हाती घेतले जाणार आहे. या मोहिमेतून रामाच्या नाव घेऊन भाजप नेत्यांनी हिंदूंना कसे फसवले आहे, हे आम्ही सांगू असे खैरे म्हणाले. प्रत्येक गावात रामरक्षा व मारुतीस्तोत्र म्हणून हा कार्यक्रम होईल. तसेच प्रत्येक जिल्ह्यात विश्व हिंदू परिषद आणि रा. स्व. संघातील प्रमुखांचीही भेट घेऊन वर्तमानपत्रातून आलेल्या गैरव्यवहारांची कात्रणे देणार असल्याचे खैरे म्हणाले. बाळासाहेबांच्या भूमिकेमुळे ' गर्व से कहो हम हिंदू है ' या प्रचाराला बळ आले होते. आता पुन्हा तीच भूमिका घेऊन आधी संत आणि साधूंना गैरव्यवहाराचा विषय समजावून सांगू, असे खैरे यांनी सांगितले.

# महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी व लिपिक एसिबीच्या जाळ्यात

छत्रपती संभाजीनगर/ जालना दि.६ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथील मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि एका कार्यालयीन लिपिकाला २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये साधना सदाशिवराव बांगर (वय ४४), मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि पठाण मुजीबखान यासीनखान (वय ४८), कार्यालयीन लिपिक यांचा समावेश आहे.

तक्रारदाराने क्षेत्रीय कामकाजासाठी भाडेतत्त्वावर पुरविलेल्या वाहनाचे जानेवारी २०२५ ते मे २०२६ या कालावधीतील सुमारे १३,३४,८५१ रुपयांचे प्रलंबित बिल सादर केले आहे त्यापैकी ३,२४,८४० रुपयांचे बील तक्रारदार यांना मिळणे बाकी आहे मंजूर करण्यासाठी आरोपींनी बिलाच्या रकमेच्या ५ टक्के दराने लाचेची मागणी केली होती. तडजोडीनंतर २० हजार रुपयांवर व्यवहार ठरला.

तक्रारदाराने याबाबत जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी करून सोमवारी सिडको कार्यालयात सापळा रचण्यात आला. यावेळी कार्यालयीन लिपिक पठाण याने तक्रारदाराकडून २० हजार रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने त्याला रंगेहात पकडले. तपासादरम्यान ही रक्कम मुख्य लेखा व वित्त अधिकारी साधना बांगर यांच्या सांगण्यावरून स्वीकारण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

कारवाई दरम्यान आरोपींकडून रोख रक्कम, मोबाईल फोन व इतर साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध छत्रपती संभाजीनगर शहरातील सिटी चौक पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. हि कारवाई पोलीस निरीक्षक श्रीमती कोमल शिंदे व अंमलदार आणि पथकाने केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग) जालना यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी स्वतः किंवा मध्यस्थामार्फत लाचेची मागणी करत असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

# छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या भरती परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होणार

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील विविध पदांच्या भरतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या लेखी ऑनलाइन परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच पार पडणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या २२२ पदांसाठी ८ जूलै रोजी ३ सत्रात आणि ९ जुलै २०२६ रोजी २ सत्रात राज्यातील १८ शहरांतील ३१ परीक्षा केंद्रांवर ऑनलाईन परीक्षा होणार आहे. परीक्षेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील काही भागात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी काही उमेदवारांनी ई-मेल, भ्रमणध्वनी आणि संदेशाद्वारे केली होती. तसेच सोशल मीडियावर परीक्षा पुढे ढकलल्याच्या अफवाही पसरत होत्या.

यासंदर्भात महापालिका प्रशासनाने मुंबई, पुणे, नाशिक येथील आपत्ती व्यवस्थापन कक्ष, स्थानिक प्रशासन तसेच ध्ङ्गए संस्थेशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला. संबंधित यंत्रणांनी परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती दिली असून हवामान विभागाच्या अंदाजानुसार ८ व ९ जुलै रोजी पावसाचा जोर कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

महापालिकेच्या माहितीनुसार, उमेदवारांना त्यांनी निवडलेल्या पहिल्या पसंतीच्या शहरातच परीक्षा केंद्र देण्यात आले आहे. तसेच सर्व ३१ परीक्षा केंद्रांची पाहणी पूर्ण झाली असून परीक्षेसाठी आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

त्यामुळे ८ व ९ जुलै २०२६ रोजी होणाऱ्या ऑनलाईन परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच घेण्यात येणार आहेत. उमेदवारांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता नियोजित वेळेत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. तसेच उमेदवारांच्या सोयीसाठी परीक्षा केंद्रावर पोहोचण्याच्या नियोजित वेळेत ३० मिनिटांची अतिरिक्त सवलत देण्यात आल्याची माहितीही प्रसिद्धीपत्रकातून देण्यात आली आहे.

# छत्रपती संभाजीनगरात रमाई घरकुल योजनेत कोट्यावधींचा गैरव्यवहार, दोषींवर कठोर कारवाई करण्याची आ.अंबादास दानवे यांची मागणी



मुंबइ दि.७ (प्रतिनिधी)- रमाई आवास घरकुल योजनेत बोगस कागदपत्रे, हाताने तयार केलेल्या लाभार्थी याद्या, अपात्र लाभार्थ्यांना मंजुरी, खोटी रेशनकार्डे व बनावट करपावत्या यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी विधान परिषद सभागृहात केला. या संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक आणि उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी दानवे यांनी सरकारकडे केली.

या प्रकरणात काही एजंट, संबंधित अधिकारी आणि इतर घटकांच्या संगनमतातून घरकुल योजनेचा गैरफायदा घेण्यात आला आहे. यापूर्वीही या प्रकरणी छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी आंदोलन करून चौकशीची मागणी केली होती, असेही अंबादास दानवे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

लाभार्थ्यांची यादी डिजिटल प्रणालीऐवजी हाताने तयार करण्यात आली आणि तीच कोणतीही शहानिशा न करता समाजकल्याण विभागाने मंजूर केली. महानगरपालिका, पीएमसी तसेच संबंधित अभियंत्यांनी स्थळ पाहणी न करता लाभ मंजूर केल्यामुळे अनेक अपात्र व्यक्तींना घरकुल मिळाले. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला लाभ देण्याचा नियम असतानाही पती-पत्नी दोघांनाही स्वतंत्रपणे घरकुल मंजूर करण्यात आल्याचा आरोप दानवे यांनी केला.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाने बनावट करपावत्या आणि रेशनकार्डे तयार करून त्यांच्याही नावांचा गैरवापर करण्यात आला आहे. संबंधित कागदपत्रे आपल्याकडे असल्याचे सांगत दानवे यांनी ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले.

या संपूर्ण प्रकरणात महानगरपालिका, समाजकल्याण विभाग, पीएमसी आणि संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद आहे. ज्या अधिकाऱ्यांनी नियमबाह्य मंजुरी दिली, बनावट कागदपत्रांच्या आधारे लाभ मंजूर केले आणि योजनेचा गैरवापर होऊ दिला, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार का, असा सवालही अंबादास दानवे यांनी राज्य सरकारला विचारला.

# पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयात अमली पदार्थांविरोधात केली जनजागृती; पोलिसांचे मार्गदर्शन

पैठण दि.७ (प्रतिनिधी)- अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यात युवक अडकू नयेत आणि व्यसनमुक्त, सुदृढ समाजाची उभारणी व्हावी, या उद्देशाने प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथे सोमवारी अमली पदार्थविरोधी जनजागृती अभियान उत्साहात पार पडले. पोलिस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत व्यसनाचे दुष्परिणाम, त्यामागील गुन्हेगारी साखळी आणि कायदेशीर परिणाम याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास पैठण पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार, छत्रपती संभाजीनगर पोलीस अधीक्षक कार्यालयाचे पोलीस उपनिरीक्षक मनोहर खंडागळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद सोनकांबळे, उपप्राचार्य वैजनाथ चाटे, हेडकॉन्स्टेबल संजय घुगे, श्रीमंत भालेराव यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सहायक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार यांनी अमली पदार्थांचे व्यसन युवकांचे शिक्षण, करिअर आणि कुटुंब उद्ध्वस्त करू शकते, असे सांगत कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडण्याचे आवाहन केले. तर हेडकॉन्स्टेबल घुगे यांनी व्यसनाधीनतेमुळे समाजात घडणाऱ्या गुन्हेगारी घटना, अपघात आणि कौटुंबिक समस्यांची उदाहरणांसह माहिती दिली

# पडेगाव कचरा प्रकल्प म्हणजे दुसरे डम्पिंग ग्राउंड; अंबादास दानवेंचा विधान परिषदेत हल्लाबोल, मंत्री पंकजा मुंडेंकडून चौकशीचे आदेश

मुंबई / छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथील पडेगाव घनकचरा प्रक्रिया प्रकल्पात क्षमतेपेक्षा अधिक कचरा टाकला जात असून, वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया न झाल्यामुळे हा प्रकल्प प्रत्यक्षात डम्पिंग ग्राउंड बनल्याचा गंभीर आरोप शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी विधान परिषद सभागृहात केला. या प्रकल्पाची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच साठलेला कचरा कालबद्ध पद्धतीने हटविण्याची मागणी दानवे यांनी राज्य सरकारकडे केली.

प्रकल्पाची क्षमता मर्यादित असतानाही मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात आहे. त्यामुळे कचऱ्याचे प्रचंड ढिगारे निर्माण झाले असून मिथेन वायू, विषारी वायूंचे उत्सर्जन आणि दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. वारंवार कचऱ्याला आग लागण्याच्या घटनांमुळे वायू प्रदूषणाची समस्याही अधिक गंभीर बनली असल्याचे अंबादास दानवे यांनी सभागृहात सांगितले.

पडेगाव परिसरातील नागरिकांची विशेष आरोग्य तपासणी झाल्याचा दावा चुकीचा आहे. त्या भागासाठी स्वतंत्र आरोग्य सर्वेक्षण आणि वैद्यकीय तपासणी करण्यात यावी, अशी मागणी दानवे यांनी केली.

पडेगाव व चिकलठाणा येथील कचरा प्रकल्पांवर शासनाने सुमारे ६७ कोटी रुपये खर्च केले असूनही अपेक्षित परिणाम दिसत नाही. कचऱ्यापासून खतनिर्मिती, प्लास्टिक प्रक्रिया आणि इतर उपक्रमांचा कोणताही पारदर्शक हिशेब नसल्याचा आरोप दानवे यांनी केला.

वायू व जलप्रदूषणाची नियमित तपासणी व्हावी, तसेच लिचेट (कचऱ्यातून तयार होणाऱ्या दूषित द्रव) प्रक्रिया यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत आहे की नाही, याचीही चौकशी करावी. पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणाऱ्या वाऱ्यामुळे पडेगाव प्रकल्पातील प्रदूषणाचा मोठा परिणाम शहरातील नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. क्षमतेपेक्षा जास्त कचरा टाकणे तातडीने थांबवावे, साठलेला कचरा वैज्ञानिक पद्धतीने हटवावा आणि संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी दानवे यांनी सभागृहात केली.

अंबादास दानवे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, 'अंबादास दानवे यांनी अत्यंत महत्त्वाचा विषय सभागृहात उपस्थित केला आहे. आपला पहिला मुद्दा असा होता की, पडेगाव येथे क्षमतेपेक्षा अधिक कचरा टाकला जात आहे का? जर क्षमतेपेक्षा अधिक कचरा तेथे टाकला जात असल्याचे आढळले, तर त्याची निश्चित चौकशी करण्यात येईल. याबाबत आजच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तपासणी करण्याच्या सूचना देण्यात येतील.

पंकजा मुंडे म्हणाल्या, ' दुसरा मुद्दा म्हणजे हा प्रश्न कधीपर्यंत मार्गी लागणार? याचे उत्तर थोडे व्यापक आहे. शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता कचरा व्यवस्थापनाचा ताण वाढला आहे. केवळ कचरा एका ठिकाणी नेऊन टाकणे म्हणजे कचरा व्यवस्थापन नव्हे, तर त्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया होणे आवश्यक आहे.'

(पान १ वरुन)

## जयंत पाटील आणि विनोद तावडे...

सत्तेत येत असल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नेमकी भूमिका काय? असणार याबाबत चर्चा झाल्याची माहिती एबीपी माझाला विश्वसनीय सूत्रांनी दिली. जयंत पाटील यांना संपर्क साधला असता त्यांनी विनोद तावडे यांच्याशी भेट झाल्याच मान्य केले. मात्र, बैठकीत अनौपचारिक चर्चा पार पडल्याची माहिती त्यांनी दिली.

अजित पवार हयात असताना दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणाची जोरदार चर्चा होती. दोन्ही पवारांचे पक्ष एकत्र आले असते तर ते एनडीए सोबत राहिले असते की इंडिया सोबत? हा प्रश्न अजित दादांच्या अपघाती निधनामुळे कायमचा अनुत्तरित राहिला आहे.

## महाबळेश्वरमध्ये १०० वर्षांतील...

आहेत. त्यामुळे, वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. महाबळेश्वरमध्ये झालेली ५१३ मिलिमीटर पावसाची नोंद ही सातारा जिल्ह्यातील आतापर्यंतच्या सर्वाधिक पावसाच्या नोंदींपैकी एक ठरली असून, निसर्गाने आपल्या रौद्ररूपाचे दर्शन घडवले आहे.

दरम्यान, या विक्रमी पावसामुळे प्रशासन सतर्क झाले असून, नागरिकांना अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात येत आहे. एकीकडे महाबळेश्वर मधील धबधबे, वेण्णा लेक, तलाव दुथडी भरून वाहत आहेत, तर दुसरीकडे हा मुसळधार पाऊस नागरिकांसाठी मोठे संकट ठरत आहे. महाबळेश्वरसह सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागाला या पावसाने अक्षरशः झोडपून काढले असून, जनजीवन पूर्वपदावर येण्यासाठी अजून काही काळ लागण्याची शक्यता आहे.

## खासगी शिकवणी वर्गांवर नियंत्रण...

आरोप केला. राज्यात अशा संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कायदा नसल्याने त्याचा गैरफायदा घेतला जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण आणि स्पर्धेचा दबाव कमी करण्यासाठी समुपदेशनासह संरक्षणात्मक उपाययोजना करण्याचीही मागणी त्यांनी केली.

चर्चेत सहभागी होताना आमदार निरंजन डावखरे यांनी मोठ्या कोचिंग संस्था फ्रँचायझी पद्धतीने राज्यभर व्यवसाय करत असल्याचे सांगितले. स्थानिक स्तरावरील क्लासेसवर कारवाई होते; मात्र दिल्लीसारख्या ठिकाणांहून चालवल्या जाणाऱ्या मोठ्या संस्थांवर प्रभावी कारवाई करणे कठीण जात असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे अशा संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम कायदेशीर यंत्रणा उभारण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

आमदार चित्रा वाघ यांनी कोचिंग क्लासेसच्या वाढत्या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक ताण येत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. स्पर्धा परीक्षांच्या तयारीदरम्यान देशात १३ हजार विद्यार्थी आत्महत्या करत असल्याची बाब गंभीर असल्याचे त्यांनी सांगितले. इंटिग्रेटेड कोर्सच्या नावाखाली सुरू असलेल्या क्लासेसवर देखरेख वाढविणे, बायोमेट्रिक उपस्थितीची व्यवस्था आणि भरारी पथकांमार्फत नियमित तपासणी करण्याची मागणीही त्यांनी केली.

## तुकाराम मुंढेंची गोरस भांडारवरील...

परिणामी हे नुकसान आता अन्न व औषध प्रशासन विभागाने भरून द्यावे, अशी मागणी गोरस भांडारचे अध्यक्ष निलेश पाटील यांनी एबीपी माझाशी बोलताना केली आहे.

अस्वच्छतेचा ठपका ठेवून आमचे खाद्य पदार्थ जप्त केले. मात्र, जप्त केलेल्या पदार्थांच्या चाचणीचे अहवाल येण्यापूर्वीच आमचा परवाना रद्द केला. ही कारवाई शेतकऱ्यांच्या दूध वितरण व्यवस्थेवर घाला घालणारी असल्याचे सांगत वर्ध्यातील ''गोरस भंडार'' संस्थेने सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले होते. ३१ मे रोजी एफडीएने केलेली कारवाई अयोग्य होती. गोरस भंडारला दूध देणाऱ्या शेकडो शेतकऱ्यांच्या दुधाचे वापर होऊ शकेल. हजारो ग्राहकांना ताजे दूध मिळू शकेल, अशी व्यवस्था पुन्हा प्रस्थापित करावी अशी मागणी या याचिकेतून करण्यात आली होती. दरम्यान ही कारवाई बेकायदेशीर असल्याचा महत्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाने दिला आहे.

## पावसाचा अंदाज पाहूनच पेरणीचा...

कारण नाही.

याचबरोबर बियाणे किंवा खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून काळाबाजार करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेतली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. ''बियाणे किंवा खतांचा काळाबाजार करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर शासनाकडून कठोर कारवाई केली जाईल,'' असे दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले.

## आरटीओतील कथित...

महाराष्ट्रात वास्तव्यास असून राज्यातील बँकांकडून कर्ज घेत असतानाही वाहनांची नोंदणी मात्र दादरा-नगर हवेली, दमण-दीव, पुदुच्चेरी आदी ठिकाणी केल्याची उदाहरणे समोर आली आहेत. अशा प्रकारांवर आरटीओकडून कारवाई सुरू आहे. भविष्यात कर चुकवेगिरी रोखण्यासाठी जीएसटी पडताळणी तसेच कर्ज व रहिवासाशी संबंधित कागदपत्रांची काटेकोर तपासणी करण्यात येईल.

आरटीओ विभागासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारी, ध्वनिचित्रफिती आणि अन्य आरोपांची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी वरिष्ठ आयपीएस अधिकारी प्रियंका नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. या त्रिसदस्यीय समितीत अतिरिक्त परिवहन आयुक्त रवी गायकवाड आणि दक्षता अधिकारी मंदार जावळे यांचा समावेश आहे. या समितीला एका महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

## वायनाडमध्ये बोगद्याचे काम...

रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अग्निशामक दल आणि आपत्ती निवारण पथक घटनास्थळी पोहोचले असून, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे जवानही बचावकार्यात सामील झाले आहेत. केरळचे महसूल मंत्री ए. पी. अनिल कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, एनडीआरएफच्या ३० जवानांचे पथक घटनास्थळी पोहोचले असून मदतकार्य वेगाने सुरू आहे.

गेल्या २४ तासांत या भागात तब्बल २६५ मिमी इतक्या विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. सतत कोसळणाऱ्या या मुसळधार पावसामुळेच ही दरड कोसळल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. या दुर्घटनेत बोगद्याच्या कामावरील कामगारांची वाहतूक करणारी काही वाहनेही ढिगाऱ्याखाली दबून पूर्णपणे चक्काचूर झाली आहेत.

या भीषण दुर्घटनेनंतर केरळचे मुख्यमंत्री व्ही. डी. सतीसन यांनी तातडीने कृषिमंत्री टी. सिद्दीकी यांच्यासोबत एक आपत्कालीन बैठक घेतली. मुख्यमंत्र्यांनी सर्व यंत्रणांना युद्धपातळीवर मदत आणि बचावकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मंत्री ए. पी. अनिल कुमार आणि मंत्री सिद्दीकी यांना तात्काळ वायनाडला रवाना होऊन प्रत्यक्ष बचावकार्यावर देखरेख ठेवण्यास सांगितले आहे.

मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हाधिकारी आणि आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने २० जून रोजीच बांधकाम साईटवरील माती हटवण्याचे आदेश कंत्राटदाराला दिले होते, मात्र या आदेशाचे पालन न केल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

## मी मौन धारण केले आहे,...

आला, अशी माहिती चंपत राय यांनी दिली.

चंपत राय यांनी आपल्या पत्रात पुढे लिहिले आहे की, मी तुम्हाला सर्वांना खात्री देतो की एसआयटीचा अंतिम अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर पसरवल्या जात असलेल्या सर्व मुद्द्यांना मी क्रमाने उत्तर देईन आणि संपूर्ण सत्य समोर येईल. संघटनेने मला १९९१ मध्ये अयोध्येला पाठवले. मी गेल्या ४५ वर्षांपासून प्रचारक आहे. मी जिथे कुठे राहिलो, तिथे माझे आयुष्य एका खुल्या पुस्तकासारखे राहिले आहे. सर्वांना आदरपूर्वक नमस्कार, असे चंपत राय यांनी म्हटले आहे.